PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 2, ISSUE 1

# जल व्यवस्थापनात महिलांचे योगदान

**प्रा. बाळकृष्ण कारु रामटेके,**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
समर्थ महाविद्यालय लाखनी
**महाराष्ट्र भारत**

पाणी म्हणजे जीवन हे खरेच आहे. पर्जन्यजल संचय पध्दती ही जीवनदायी संजीवनीच आहे. माणसाच्या अस्तित्वांच्या पाऊलखूणा या पृथ्वीवर असतील तोवर या संजीवनीचा ठेवा जागण्यासाठी आपण कटीबध्द होण्याची नितांत आवश्यकता आहे. कारण १९५१ साली भारतात दरडोई ५१४७ क्युबीक मिटर पाणी उपलब्ध होते. २००१ मध्ये हेच प्रमाण १८२० वर आले. येत्या २०१५ मध्ये हेच प्रमाण १३४० क्युबीक मिटरवर येईल. आपणास तेव्हा पाण्याचे अधिकच दुर्भिक्ष जाणवेल. २०५०सालापर्यंत ६० देशातील ७ अब्ज लोकांना पाण्यांची मोठया प्रमाणांत समस्या जाणवेल त्यात पर्यावरणांतील बदलामुळे आणखी भर पडत जाईल.ही समस्या जटिलही होईल.

पाणी मिळण्याचा एकमेव स्त्रोत म्हणजे पावसाचे पाणी. माणसाच्या घरगुती, शेतीच्या, घरबांधणीच्या, औद्योगिक गरजा पूर्ण करण्यासाठी व जनावरांना लागणारे पाणी,बागा,तरण तलाव यासाठी लागणारे एकूण पाणी आकाशातुन पडणाऱ्या पाण्यांच्या १५ ते १६ प्रतिषत इतके आहे. मात्र तेवढेही पाणी आपण साठवत नसल्याने पाण्याची टंचाई जाणवते. कदाचीत पुढील महायुध्द पाण्यासाठी लढले जाईल असे तज्ञांचे मत आहे. या सगळयांच्या मूळाशी अनेक कारणे आढळतात. जागतिक तापमानात झालेली वाढ, वातावरणात होत असलेले बदल, निसर्गाच्या स्वातंत्र्यात माणसाकडून होणारी ढवळाढवळ यामुळे पाऊस अनियमित झालेला आहे. त्यामुळे नजिकच्या काळात गावात, तालुका, जिल्हा पातळीवर शहरातील सोसायटयांमध्ये पर्जन्य जल संचय करणे बंधनकारक व्हायला पाहिजे.

कौटुंबिक व्यवस्थापनाबरोबर जीवनदायी पाण्याचे नियोजन अन् व्यवस्थापन हे प्रामुख्याने आदिम काळापासून स्त्रियांच्याच हाती आहेत. नदीला स्त्रीच्या रुपात ऋग्वेदापासून पाहण्यात येते म्हणूनच महिलांचा पाण्याचा संबंध पाणी उपलब्धतेबाबत येतो. आपल्या घरी पुरेल इतके पाणी आहे किंवा नाही. नसेल तर ते उपलब्ध करण्यांची जबाबदारी महिलांवर असते. पाणी वापरण्याची कामगिरी पुरुष बजावतात आणि म्हणून जल व्यवस्थापनात महिलांचा सहभाग अत्यंत आवश्यक आहे. जल शब्दांची उत्पती सांगतांना — ''ज्यातून जीव सृष्टी निर्माण होते आणि ज्यात विलीन पावते ते म्हणजे जल. तसेच स्त्री सुध्दा सृजनांचे मोठे प्रतीक आहे. स्त्रीच साऱ्या जगाची निर्माती

आहे. त्यामुळे जल नियोजनांत स्त्रीचे मोलाचे योगदान आहे. हे समजण्यास विसरुन चालणार नाही.

पृथ्वीतलावर केवळ १५ प्रतिशत पाणी माणसांच्या वाटयाला येत आहे त्यामुळे मोठया प्रमाणत जंगले नष्ट होत आहेत महाराष्ट्रात या १० वर्षात ३३००० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. तरीही मानवाचे डाळे अजूनपर्यंत उघडलेले नाही असे दिसून येते. भारतात २.४३ क्यूबीक मिटर पाणी मिळते. पुरातन काळात जल, पर्यावरण व शेती व्यवस्थापनात महिलांचा सहभाग मोठया प्रमाणांवर होता. त्यामुळे पर्यावरणाचे व्यवस्थापन आजपर्यंत राखले गेले. मध्यंतरीचे काळात जलव्यवस्थापनांचे व शेती व्यवस्थापनांचे तंत्र बिघडण्यात सुरुवात झाली. अलिकडच्या काळातील पर्यावरणावरील संतुलनाबाबतची नोबल पुरस्कार श्रीमती द.ए. थुई या महिलेला देण्यात आला. अर्थातच पर्यावरण संतुलनांची जबाबदारी स्त्रियाच सक्षमपणे पार पाडू शकतात. एखाद्या कार्यात पुरुषांचे वर्चस्व राहील व स्त्रीचा मुळीच सहभाग राहणार नाही तेथे नियोजनाचे तंत्र घातक ठरु शकते.

२०२५ पर्यंत जागतिक १/३ लोकसंख्येला पाण्याचे समस्येला सामोरे जावे लागेल असे मत वॉटर मॅनेजमेंट इन्स्टीटयुट यांनी व्यक्त केले. १९९२ साली ब्राझील येथे झालेल्या जागतिक वसुंधरा परिषदेत १०५ देशांचा सहभाग होता. जिथे जागतिक वसुंधरा परिषदेने जल व्यवस्थापनांत महिलांचा सहभाग आवश्यक करुन अजेंडा – २१ व अजेंडा–१८ या सूत्राप्रमाणे जल व्यवस्थापनांत महिलांचा सहभाग असावा यावर जागतिक मत तयार झाले. ब्राझीलच्या जागतिक संमेलनानंतर सन १९९६ साली जागतिक पातळीवर अशा दोन प्रमुख संस्था स्थापन करण्यात आल्या. त्यात जागतिक जल परिषद आणि जागतिक जल सहभागिता या संस्था जल व्यवस्थापनांत महिलांचा सहभाग आवश्यक करण्याबाबत अजेंडा – २१ मध्ये अंतर्भाव करण्यात आला. जागतिक स्त्रियांवर याबाबत जाणीवपूर्वक प्रयत्न केल्या जात आहे. मोरक्को येथे झालेल्या पहिल्या जागतिक संमेलनात, हेन येथे दुसऱ्या क्योटो(जपान) येथे तीसऱ्या व मेक्सिको येथे चौथ्या जागतिक जल संमेलनात झाले. २००२ साली पहिले आशिया जल संमेलन काठमांडू (नेपाल) येथील संमेलनात महिलांचा व्यवस्थापनात सहभाग नेमका कोणत्या स्थरावर असावा यासंबंधी नियम ठरविण्यात आले. मध्यप्रदेशामध्ये पुण्यश्लेक अहिल्याबाई होळकर यांनी पाण्यांचे नियोजन केले १७६६ ते १७९५ या काळात महिलांना पाण्यासंबंधीच्या प्रश्नांची त्याना जाण होती. त्यांनी गावागावांत नदीवर घाट बांधून महिलांनी पाण्याचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. जल व्यवस्थापन म्हणजे फक्त पाण्यांची उपलब्धता व वापर एवढयावरच थांबून चालणार नाही हे सूत्र अहिल्याबाईने आपल्या नियोजनातून व कार्यातून सिध्द केले. या काळांत महाराष्ट्रातील नव्हे तर मध्यप्रदेश,राजस्थान,गुजरात आणि दक्षिणेतील काही भागात पावसाळयानंतर नदीच्या पाण्याचा वापर योग्य पध्दतीने करता यावा यासाठी जनजागृती केली. जेजुरीच्या तलाव, चांदवड, शेरपूर, अचलपूर येथील बारवाहे उत्तम उदाहरण होय. आजही कितीही दुष्काळ पडला तरीही पाण्याची कमतरता पडत नाही. आजही बरेच तलाव स्त्रियांनी निर्माण केले आहे कारण ग्राम रचना ही स्त्रियांचीच होती असे प्राचीन काळांत पाहायला मिळते.

जागतिक जल सहभागिताच्या स्थापनेपासून भारतीय जल सहभागिता नवी दिल्लिमध्ये ही महिला पाणी मंच नागपूर या संस्थेने महिलांना सहभाग देऊन सहयोगाचा प्रयत्न जाणीवपूर्वक केला

आहे. पाटबंधारे प्रकल्प अंतर्गत काम करतांना प्रकल्पाचे प्रत्यक्ष पाणी शेतात महिला वळवित असतात, कारण पुरुषांना राजकारण, निवडणूक, सोसायटया, ग्रामपंचायती, सरकारी कामकाज इत्यादीकरीता बाहेर रहावे लागत असल्यामुळे महिलांना सण व घरगुती महत्वाचे दिवस सोडून पाणी वाया जाणार नाहीत याची काळजी महिला घेत असत. टॉयलेट मध्ये १०—१२ लिटर पाणी खर्च होते, कपडे घुणे, गाडया भांडे, बगीचा इत्यादी कामासाठी वापरले जाते, स्वयंपाक करतांना तांदुळ, भाज्या धुण्यासाठी तर मोलकरीन सहजपणे २—३ लिटर पाणी वापरून घेते. सुशिक्षीत म्हणणाऱ्या मोलकरणीच्या बाबतीत कधीच लक्ष नसते. तहान लागली नसली तरी पाहुण्यांना पाणी देण्याची आपल्याकडे परंपरा आहे. अर्थात ही चांगली संस्कृती आहे. परंतू जर कोणी ते वापरले नाही तर ते फेकुन दिल्या जाते. ते झाडांच्या कुंडीत टाकल्यास उपयोगाचे होईल. याउलट पुरूश मंडळी दाढी करतांना नळ सुरू ठेवून सुमारे १० मिनीट नळ चालु ठेवतात. झाडांना रोज दोनदा पाणी देतात. झाडे धुवून पाणी देतात कारण सुट्टीच्या दिवसी घरी महिला काम सांगतील म्हणून पाणी वाया जाई पर्यंत पाण्याचा वापर करतात असे लक्षात येते. तसेच शिळे, कालचे पाणी जसे— गुंड, माठ, बकेट इत्यादी मधील पाणी रोज बाहेर पुरूष मंडळी फेकतात, परंतू महिला त्या पाण्याचा उपयोग कपडे धुणे, भांडी साफ करणे व झाडाला पाणी देण्याकरिता उपयोगात आणतात. या किरकोळ बाबीमुळे शहरात करोडो रूपये खर्च करून शुध्द केलेल्या पाण्याचा गैरवापर होते. शहरातील घरे, फ्लॅट, वस्ती यामधील नळे नेहमी गळत राहतात. रेल्वेतील नळ सतत सुरू असतात, काही प्रवासी जाणीवपूर्वक सुरू ठेवतात. नादुरूस्त नळाचे पाईप व गळलेले नळ सतत सुरू असतात, त्यामुळे महिलांनी हे दृश्य पाहील्यास त्यांना हळहळ वाटते त्यामुळे त्यांच्या निदेशनातून हे प्रमाण कमी होवू शकते. पाण्याचे मुल्य न जाणणारे, विसरभोळे लोक नळ सुरू करतात परंतू व्यवस्थित बंद करीत नाही, ज्यामुळे नळातील थेंब—थेब पाणी गळत राहते. परंतू या गोष्टीकडे पुरूष मंडळी फारसे लक्ष देत नसले तरी महिला मात्र हळहळ व्यक्त करून हातचे काम टाकून त्याबंद करण्याचा प्रयत्न करतात. पाणी संचयनासाठी जे कष्ट महिलांना माहित असते. या पार्श्वभूमीवर जल नियोजन करणे आवश्यक आहे व हे नियोजन करतांना महिलांचा त्यामध्ये सहभाग होणे आवश्यक आहे. येणाऱ्या पुहुणे मंडळींना अर्धा ग्लास पाणी देणे पुरेसे आहे. पाणी जीवनाचे मोल आहे, पाणी म्हणजे जीवन आहे, पाणी निट वापरले जावे, सांभाळून स्वच्छ ठेवले तरच आपण सर्व सुखाने जगु नाही तर पाण्याशिवाय आपणच जगणार नाही. ''जल है तो कल है'' या म्हणीचा उपयोग समजावा, अन्यथा काहीच उरणार नाही.

जल व्यवस्थापनाची सूक्ष्मता महीलांच्या सहभागाशिवाय समजून घेणे अवघड आहे. म्हणूनच २००० साली महिला पाणी मंच ची स्थापना केली. या मचाद्वारे जल व्यवस्थापनात महिलांनी पुढाकार घ्यावा त्यांनी आपले प्रश्न मांडावेत त्यावर उपाय सुचवावेत अशा भूमिकेतून महिला मंच सातत्याने काम करित आहे. या माध्यमातून राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर महिला पाणी मंच भारतीय महिलांचे प्रतिनिधित्व करणे, देश पातळीवर (World Water Council) नावाची (Global Water partnership) संलग्न संघटना कार्यरत आहे. महिला पाणी मंच ने पाण्यांचे प्रश्न कायम स्वरूपी सुटावे यासाठी अनेक उपक्रम केलेत, त्यातील महत्वांचा उपक्रम म्हणजे जल व्यवस्थापनांचा प्रश्न, उपाय, गुंतागुंत, साहित्यिकांची भाषणे, कथा, कादंबरी, लेख, कविता, स्लोगन यांच्या माध्यमातुन जनतेसमोर मांडले. त्यासाठी नागपूर येथे २००० साली पहिले अखिल भारतीय जल साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले. तसेच २००७ साली वर्धा खोऱ्यांत यशोधा जल

सहभागिता स्थापन करून खोऱ्याचे नियोजनात महिलांचा सहभाग प्रत्यक्षपणे जाणवतो आहे. जल व्यवस्थापनामध्ये महिलांचा सहभागाविषयी आग्रही असतांना त्यांचा सहभाग नियोजनापासून अंमलबजावणी करणे, प्रसार करणे, योजना कार्यान्वित करणे, पाण्याची उपलब्धता करून योजनेची देखभाल, दुरूस्ती करणे या स्थरावर जाणीवपूर्वक सहभाग घेतल्या जातो. काटकसर करणे, बचत करणे, जपून वापरणे, महत्व देऊन महत्वाचे प्रसंगी मदत करणे, पाहुण्यांचे स्वागत करण्यापासून तर त्यांना घरातील इतर सोई सोबत पाण्याचा काटकसरीने वापर करणे इत्यादी माहिती पुरूषापेक्षा महिला चांगल्याप्रकारे देऊ शकतात. कारण हा स्त्रियांचा गुणधर्म आहे. पूर्वी गांव खेडयांत विहीरी कमी होत्या उन्हाळयात पाण्याचा प्रश्न निर्माण होत असल्यामुळे लांबून डोक्यावर दोन गुंड व हातात एखादा लहान गुंड, बादली पाणी भरून सर्व पुरूष मंडळीच्या समोर स्वत:ला सावरून पाणी घरी आणण्यांची कसरत महिलाच करीत होत्या. बऱ्याच ठिकाणी गावाकडील नदीवरून पाणी आणावे लागत होते. पाणी आणण्याचा त्रास होतो म्हणून महिला आपल्या घरचे कपडे, भांडी — कुंडी इत्यादी धुण्याकरिता नदीचाच उपयोग भर उन्हात देखील करीत होत्या. यात अपार कष्ट होत होते. पुढे सार्वजनिक विहिरी गावात झाल्या तरीही गुंड भरून पाणी डोक्यावर आणावे लागत होते. आता घरोघरी नल, मोटर पंप आले तरी भरण्याची, वाचविण्याची, वापरण्याची जबाबदारी महिलांवर आहे. पाणी भरण्याकरीता किती त्रास होतो यांची जाणीव असल्यामुळे पाणी भरून त्यांचा कशा प्रकारचे वापर करावे पाणी कसे वाचविता येईल हे करण्याकरिता किती कष्ट घ्यावे लागते याची कल्पना महिलाशिवाय कुणालाही जाणवू शकत नाही. जल व्यवस्थापनांत महिलांचा सहभाग अत्यंत महत्वाचा आहे. त्यामुळे पर्यावरणासंबंधीचे प्रश्न महिलांच्या प्रयत्नाने कायम प्रकारे सुटण्यास मदत होईल असे मला वाटते.

भंडारा, गोंदिया जिल्हयात बरेचशे मालगुजारी तलाव व लहान — मोठे बोडया, पाझर तलाव महिलाच्या सहकार्याने तयार करण्यात आले. असा उल्लेख आहे. त्यामुळे पिण्याचे पाण्याचा प्रश्न व शेतीच्या पाण्याचा प्रश्न सोडविल्याची उदाहरणे आहेत. पाणलोट विकासात महाराष्ट्रामध्ये महिलांनी उत्तम कार्य केल्याची अनेक उदाहरणे आहेत. अश्विनी भिडे, पी. राधा, अनघा पाटील, मेघा पाटकर, मृणाल गोरे इत्यादींचे उदाहरणे देता येतील.

आतापर्यंत ''जिच्या हाती पाळण्यांची दोरी ती जगाला उद्धारी'' असे आपण म्हणत असे. परंतु आता ''जिच्या हाती पाण्याची कटोरी ती आम्हा सर्वांनी उद्धारी'' असे म्हणण्यास वावगे ठरणार नाही. पाण्याकडे गांभीर्याने बघा, पाण्यासाठी भविष्यांत महायुद्ध होऊ शकते. सरकारने कायदे करून नियंत्रणाचे महत्व पटवून दयावे. पाणी अडवा, जिरवा, वाचवा, योग्य उपयोग करा हा मंत्र द्यावा. नवे गांव, शहर, वस्ती, सोसायटया निर्माण करताना पावसाच्या पाण्याचे नियोजन असल्याशिवाय त्यांना परवानगी देऊ नये. (Water Harvesting). आपण वेळीच जागे झालो नाही तर पुढच्या पिढीचे पाण्यामुळे फार मोठे गुन्हेगार ठरू शकते हे ध्यानात घ्यावे. पाणी हा प्रत्येकाचा मुलभूत अधिकार असला तरी त्यांचा योग्य काटकसरीने महिलांच्या सल्ल्याने वापर व्हावा हे आपले आद्य कर्तव्य आहे.

आज पाण्याचा प्रश्न इतका उग्र रूप झाला आहे की, स्त्रियांना आता घरात गुपचूप राहणे शक्य नाही. जल व्यवस्थापन हे पुरातत्व शाखा आहे. पाण्याला जिवन संबोधले जावे. या

जीवन व्यवस्थापनात व जल व्यवस्थापनात महिला सहभाग महत्वाचा असतो. नदी किनारी राहणे व पाणी यांचा अनन्य संबंध आहे. पूर्वी नदी किनारी सुपीक भागात सुरवातीच्या काळात मानवी जीवनाची सुरवात झाल्याने मानवाच्या वसाहती नदी किनारी सुपीक जमिनीच्या व पाणी ज्या भागात आहे तिथे वसाहती स्थापन झाल्या. अगदी मोहेंजोदारो व हडप्पा संस्कृती पासून म्हणूनच नद्यांची नावे महिलांच्या नावावर ठेवण्यात आली. जसे — गंगा, ब्रम्हपुत्रा, यमुना, सरस्वती, कावेरी, गोदावरी, यशोदा अशी अनेक नद्यांची नावे आहेत. ज्या आपल्या लोकमाता आहेत.

**सारांश**

जल व्यवस्थापनात जल अर्थशास्त्र ही नवीन संकल्पना असून भारताला तात्काळ मोठी झेप घेणे गरजेचे आहे. असे आंतरराष्ट्रीय जल तज्ञ माधव चितळे यांनी व्यक्त केले. जल संस्कृती मंडळात त्यांनी जल व्यवस्थापन विषयी आपले मत मांडताना नद्या जोड प्रकल्प व मुंबईचा प्रलय, अलिकडचा उत्तरांचल आपत्ती इत्यादी अशा घटनांना तोंड देण्यासाठी भारतात पाणी गांभीर्याने हाताळले जात नाही याबद्दल खंत व्यक्त केली. जल व्यवस्थापनात सहभागांसाठी शासकीय पातळीवर होणारी कामे, शैक्षणिक अभ्यासक्रमात जल व्यवस्थापनाचा पर्यायाने पर्यावरणांचा समावेश, जल व्यवस्थापनात व्यावसायीक लोक जागृती (Water Harvesting) इत्यादीच्या अवश्य विचार करावा. जिथे ढिवर (माणसे) मासे पकडता तिथे ढिवरीन (स्त्रिया) डांगर व टरबुजांची शेती (वाडी) नदीच्या रेतीत करतात व उत्पन्न मिळवून पाण्यांचा उपयोग व कुटूंबाला मदत करतात. पाणी हा पर्यावरणांचा एक भाग आहे. हे समजल्याशिवाय पर्यावरण कळणार नाही. मानवी जीवन, पशु, वनस्पती जीवन यांची सांगड घालूनच पाणी व्यवस्थापन करावे. पाण्याच्या क्षेत्रात शासकीय गुंतवणुक पुरेशी नाही त्यात खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढवावा. पाणी व्यवस्थापनांत मोठया प्रयत्नांत जनसहभाग व महिलांना महत्व देऊन व्यवस्थापनात महिलांचा सहभाग वाढविल्यास निश्चित पाण्यांचा व पर्यावरणाचा प्रश्न काही प्रमाणात कमी होऊ शकतो.

## संदर्भ ग्रंथ सूची:—

१) www.mtngpletters.com

२) जल व्यवस्थापन अहवाल, महाराष्ट्र शासन

३) दैनिक महाराष्ट्र टाईम्स, दि. ६ एप्रिल २०१४

४) दैनिक लोकमव श्री माधव चितळे, आंतरराष्ट्रीय जल तज्ञ

५) दै. लोकमत दि. २६ मे,२०१४ श्री. अ.पा. देशपांडे व श्री सीताराम शेलार, जल